RNI No. MAHBIL /2012/47985
www.dgps.maharashtra.gov.in

# महाराष्ट्र शासन राजपत्र

# भाग एक-अ–पुणे विभागीय पुरवणी

वर्ष - ११, अंक - १९ ] गुरुवार ते बुधवार, डिसेंबर २२ - २८, २०२२ / पौष १ - ७, शके १९४४ [ पृष्ठे ९

## प्राधिकृत प्रकाशन

### जिल्हाधिकारी यांजकडून

### आदेश

क्रमांक कार्या-११/नपा/आरआर-९५/२०२२.--महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ चे कलम २० व महाराष्ट्र नगरपरिषदा आणि नगरपंचायती (नामनिर्देशित सदस्यांची अर्हता व नियुक्त्या करण्याची पद्धत) नियम, २०१० मधील नियम क्रमांक ६ नुसार प्रदान केलेल्या अधिकारान्वये मी, राहुल रेखावार, जिल्हाधिकारी, कोल्हापूर, या प्रकटनाद्वारे असे प्रसिद्ध करतो की, खालील अनुसूचीत नमूद केल्याप्रमाणे हुपरी नगरपरिषदेच्या दिनांक २५ नोव्हेंबर २०२२ रोजीचे सर्वसाधारण सभेमध्ये संबंधित व्यक्ती हुपरी नगरपरिषदेवर नामनिर्देशित सदस्य म्हणून नामनिर्देशित केल्याचे जाहीर करणेत आले आहे.

### परिशिष्ट

| अ. क्र. | नगरपरिषदेचे नाव | नामनिर्देशित सदस्याचे नाव | सर्वसाधारण सभा दिनांक |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| १ | हुपरी नगरपरिषद | बारगे चंद्रकांत शांतीनाथ | २५-११-२०२२ |

**राहुल रेखावार,**

जिल्हाधिकारी, कोल्हापूर.

कोल्हापूर, १३ डिसेंबर २०२२.

---

## BY COLLECTOR

### Order

क्रमांक कार्या-११/नपा/आरआर-९५/२०२२.–As per the provisions contained in the Section 20 of the Maharashtra Municipal Councils, Nagarpanchayats and Industrial Townships Act, 1965 and as per the Rule No. 6 of the Maharashtra Municipal Councils and Nagarpanchayats (Qualifications and the procedure for appointment of Nominated Councillors) Rules, 2010.

I, Rahul Rekhawar, the Collector of Kolhapur, hereby publish in the following Schedule the name of the person who has been nominated as Nominated Councillor of the Hupari Municipal Council in Kolhapur District in the General Meeting of the Hupari Municipal Council held on dated 25th November 2022.

**Schedule**

| Sr. No. | Name of the Municipal Council | Name of the Nominated Councillor | Date of General Meeting |
|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 |
| 1 | Hupari Municipal Council | Barage Chandrakant Shantinath | 25-11-2022 |

**RAHUL REKHAWAR,**
Collector, Kolhapur.

Kolhapur, 13th December 2022.

---

**आयुक्त तथा प्रादेशिक संचालक यांजकडून**

*महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ चे कलम ३२२* (३) (फ) *अन्वये सांडपाणी प्रक्रिया योजना शुल्क उपविधी-२०२२, या उपविधीस मान्यता देणेबाबत.*

**वाचा :** (१) महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ चे कलम ३२२ *(३) (फ).*

(२) मा. आयुक्त तथा संचालक, नगरपरिषद प्रशासन संचालनालय, मुंबई यांचेकडील आदेश क्रमांक नपसु-२००१/प्र. क्र. १/२००१/५, दिनांक १ जानेवारी २००१.

(३) मुख्याधिकारी, मलकापूर नगरपरिषद यांचेकडील पत्र क्रमांक जा. क्रमांक मलकापूर-सातारा/उपविधी/५१८/२०२२, दिनांक २५ जुलै २०२२.

(४) मा. जिल्हाधिकारीसो, सातारा यांचेकडील क्रमांक साशा/नपा/का. २/११८/२०४७/२०२२, दिनांक २ सप्टेंबर २०२२ व क्रमांक ४३८, दिनांक २६ सप्टेंबर २०२२ चे पत्र.

***अधिसूचना***

क्रमांक नपा/२/काවि-८८१/२०२२.--ज्याअर्थी, महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ चे कलम ३२२ *(१)* अन्वये नगरपरिषदेस आपला कारभार चालविणेसाठी उपविधी करण्याचा अधिकार आहे. त्यानुसार मलकापूर नगरपरिषदेने महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ चे कलम ३२२ *(३) (अ)* अन्वये मलकापूर नगरपरिषद यांनी विशेष सभा दिनांक ३ फेब्रुवारी २०२२ च्या ठराव क्रमांक २ अन्वये उक्त विषयाची प्रारूप उपविधी करणेस मान्यता दिलेली आहे. त्यानुसार दिनांक १० फेब्रुवारी २०२२ रोजीचे वर्तमानपत्र दै. सकाळ व दै. प्रीतिसंगम यांमधून जाहीर नोटिस प्रसिद्ध करून हरकती व सूचना मागविणेत आलेल्या होत्या. मुदतीमध्ये मलकापूर नगरपरिषदेकडे उपविधीच्या अनुषंगाने प्राप्त हरकती व सूचनांचा विचार करून व त्यांना प्राप्त अधिकारांनुसार मलकापूर नगरपरिषदेने दिनांक १९ जुलै २०२२ रोजीच्या विशेष सभेमध्ये ठराव क्रमांक १ व ३ अन्वये अनुक्रमे सांडपाणी प्रक्रिया योजना शुल्क उपविधी-२०२२ या उपविधींना मान्यता देण्यात आलेली आहे.

त्याअर्थी, सदर उपविधीची छाननी करून ते योग्य असलेची खात्री झाल्यामुळे महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ चे कलम ३२२ *(३) (फ)* मधील तरतुदींनुसार मला प्राप्त अधिकाराचा वापर करून मी, सौरभ राव, आयुक्त तथा संचालक, नगरपरिषद प्रशासन संचालनालय, पुणे मलकापूर नगरपरिषदेच्या सांडपाणी प्रक्रिया योजना शुल्क उपविधी-२०२२ या उपविधींना अंतिम मंजुरी देत आहे.

**मलकापूर नगरपरिषद, जिल्हा सातारा**

**सांडपाणी प्रक्रिया योजनेसाठी घ्यावयाचे शुल्क उपविधी - २०२२**

**१. संक्षिप्त नाव व प्रारंभ :**

(अ) या उपविधीस "मलकापूर नगरपरिषदेचे सांडपाणी प्रक्रिया योजनेसाठी घ्यावयाचे शुल्क संबंधीचे उपविधी २०२२" असे संबोधण्यात येईल.

(ब) सदरचे उपविधी महाराष्ट्र शासनाच्या राजपत्रात प्रसिद्ध झालेच्या तारखेपासून अंमलात येतील.

**२. व्याख्या :**

(१) संदर्भानुसार दुसरा अर्थ अपेक्षित नसेल तर या उपविधीमध्ये.--

(अ) "अधिनियम" म्हणजे महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५.

(ब) "मुख्याधिकारी" म्हणजे नगरपरिषद क्षेत्रासाठी मुख्याधिकारी म्हणून या अधिनियमान्वये नेमलेला किंवा नेमणूक केली असल्याचे समजण्यात आलेली व्यक्ती.

(क) "उपविधी" म्हणजे प्रस्तुतीची उपविधी.

(ड) "कलम" म्हणजे नगरपरिषदेचे अधिनियमाचे कलम.

(इ) "परिषद" म्हणजे मलकापूर नगरपरिषद, जिल्हा सातारा.

(फ) "नगरपरिषद हद्द" म्हणजे मलकापूर नगरपरिषदेची हद्द.

(ग) "इमारत" म्हणजे सदनिका, गाळा, युनिट किंवा इमारतीचा कोणताही भाग.

(ह) "अपार्टमेंट" म्हणजे इमारत किंवा इमारतींचा समुह (रहिवासी, वाणिज्य व औद्योगिक).

(ज) "वैयक्तिक बांधकाम" म्हणजे वैयक्तिक घर किंवा घरांचा समूह (रहिवासी, वाणिज्य व औद्योगिक).

(ल) "बांधकाम व्यावसायिक" म्हणजे विकसक किंवा सक्षम नोंदणीकृत इमारत बांधकाम व्यावसायिक (रहिवासी, वाणिज्य व औद्योगिक).

(म) "अंदाजपत्रकीय रक्कम" म्हणजे महाराष्ट्रातील सर्व महानगरपालिका (बृहन्मुंबई महानगरपालिका वगळून) नगरपरिषदा/नगरपंचायती, प्रभाव व ग्रामीण क्षेत्र यामधील मिळकतींचे वार्षिक मूल्य दर तक्त्यानुसार मुद्रांक शुल्क आकारणी करण्यासाठी अद्ययावत व सुधारणेसह सर्वसाधारण मार्गदर्शन सूचनेमध्ये मा. नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी वेळोवेळी नमूद केलेले बांधकामाचे प्रस्तावित दर व बांधकामाचे क्षेत्र यानुसार येणारी रक्कम (रहिवासी, वाणिज्य व औद्योगिक).

(न) "शुल्क" म्हणजे नगरपरिषदेच्या कार्यक्षेत्रामध्ये बांधकाम व्यवसायामार्फत अपार्टमेंट बांधून त्यामध्ये सदनिका विक्री करणार आहेत. त्यांना बांधकाम परवानगी देत असताना आकारावयाचे सांडपाणी प्रक्रिया योजनेसाठी शुल्क.

(प) "सांडपाणी प्रक्रिया योजनेसाठी घ्यावयाचे शुल्क" भरण्याचे ठिकाण नगरपरिषद कार्यालयामध्ये निश्चित केलेले ठिकाण.

(र) या उपविधीमध्ये व्याख्या न केलेल्या शब्द प्रयोगांना जो अर्थ महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ मधील अर्थ असेल तोच संबोधनेचा आहे.

**३. शुल्काचा दर व स्वरूप :**

मलकापूर नगरपरिषदेच्या कार्यक्षेत्रामध्ये बांधकाम व्यावसायिकांमार्फत अपार्टमेंट बांधून त्यामध्ये सदनिका विक्री करणार आहेत. अशा बांधकाम व्यावसायिकांना इमारत बांधकाम परवाना देत असताना एकूण अपार्टमेंट बांधकामाच्या अंदाजपत्रकीय रकमेच्या ०.५० टक्के व वैयक्तिक बांधकामांना इमारत बांधकाम परवाना देत असताना वैयक्तिक बांधकामाच्या अंदाजपत्रकीय रकमेच्या ०.५० टक्के शुल्क सांडपाणी प्रक्रिया योजनेसाठी शुल्क घेण्यात येईल.

**४. शुल्क आकारण्याची पद्धत :**

महाराष्ट्रातील सर्व महानगरपालिका (बृहन्मुंबई महानगरपालिका वगळून) नगरपरिषदा/नगरपंचायती, प्रभाव व ग्रामीण क्षेत्र यांमधील मिळकतींचे वार्षिक मूल्य दर तक्त्यानुसार मुद्रांक शुल्क आकारणी करण्यासाठी अद्ययावत व सुधारणेसह सर्वसाधारण मार्गदर्शक सूचनेमध्ये मा. नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी वेळोवेळी नमूद केलेले बांधकामाचे प्रस्तावित दर व बांधकामाचे क्षेत्र यानुसार आकारण्यात येईल. सदर आकारणी खालीलप्रमाणे असेल.

| अ. क्र. | बांधकामाचा प्रकार | सांडपाणी प्रक्रिया योजनेसाठी आकारणेत येणारे शुल्क |
|---|---|---|
| १ | अपार्टमेंट | (बांधकामाचे क्षेत्र x वार्षिक मूल्यदर तक्त्यानुसार बांधकामाचा दर) x ०.५० टक्के |
| २ | वैयक्तिक बांधकाम | (बांधकामाचे क्षेत्र x वार्षिक मूल्यदर तक्त्यानुसार बांधकामाचा दर) x ०.५० टक्के |

**५. शुल्कासाठी पात्र असणारे बांधकाम :**

मलकापूर नगरपरिषद कार्यक्षेत्रामध्ये अपार्टमेंट बांधकाम किंवा वैयक्तिक बांधकाम करण्यासाठी येणारे विकसक किंवा सक्षम नोंदणीकृत इमारत बांधकाम व्यावसायिक (रहिवाशी, वाणिज्य व औद्योगिक).

**६. शुल्क माफी :**

केंद्र, राज्य सरकार व नगरपरिषदेच्या स्वमालकीच्या इमारती, तसेच मलकापूर नगरपरिषद कार्यक्षेत्रामध्ये जे बांधकाम व्यावसायिक स्वत:च्या बांधकामाच्या क्षेत्रामध्ये सांडपाणी प्रक्रिया केंद्र उभे करतील व कार्यान्वित ठेवतील असे अपार्टमेंट किंवा वैयक्तिक बांधकाम, परंतु संबंधितांनी इमारत परवाना घेण्यापूर्वी सांडपाणी प्रक्रिया केंद्राचा सविस्तर तांत्रिक आराखडा नगरपरिषदेचे सक्षम अभियंता/महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांच्याकडून मंजूर करून घेणे व त्याप्रमाणे बंधपत्र करून देणे बंधनकारक राहील.

**७. शुल्क म्हणून मिळणाऱ्या शुल्काचा विनियोग :**

सांडपाणी प्रक्रिया योजनेसाठी शुल्क म्हणून प्राप्त होणाऱ्या रकमेसाठी बँकेचे स्वतंत्र खाते उघडणे व स्वतंत्र हिशोब ठेवणे बंधनकारक आहे. सांडपाणी प्रक्रिया योजनेसाठी शुल्कापोटी मिळणारी रक्कम सांडपाणी प्रक्रिया योजनेच्या उभारणी कामासाठी, योजनेच्या बळकटीकरणासाठी व योजना कार्यान्वित करण्यासाठीच खर्च करणे बंधनकारक राहील. सदर योजनेतून शुल्क म्हणून प्राप्त होणारी रक्कम अन्य कारणांसाठी खर्च केल्यास अथवा अन्यत्र वळविल्यास वित्तीय अनियमितता समजण्यात येईल.

**८. शुल्काची वसुली :**

महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ चे कलम १५० व १५२ अंतर्गत वसुली पद्धत अवलंबवयाची आहे. उक्त अधिनियमाचे कलम १५० *(१)* नुसार सांडपाणी प्रक्रिया योजनेसाठी शुल्काचे बील देणे, बिलामध्ये शुल्क भरण्यासाठी १ महिन्याची मुदत देणे व त्यानुसार शुल्काची वसुली करणे बंधनकारक राहील.

**९. सर्वसाधारण शास्ती :**

सदर उपविधीचे जो कोणी व्यक्ती, संस्था, विकसक किंवा बांधकाम व्यावसायिक भंग करील तो शास्तीनंतर महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ चे कलम २९९ मध्ये नमूद केल्यानुसार सर्वसाधारण शास्तीस पात्र होईल.

**१०. शुल्काचे पुर्ननिर्धारण :**

सांडपाणी प्रक्रिया योजनेसाठी घेण्यात येणारे शुल्कामध्ये सुधारणा अथवा फेरफार करण्यास नगरपरिषद सक्षम राहील, मात्र यासाठी १ महिना मुदतीची नोटिस प्रसिद्ध करणे आवश्यक आहे. तसेच सांडपाणी प्रक्रिया योजनेसाठी घेण्यात येणाऱ्या शुल्कामध्ये सुधारणा अथवा फेरफार करण्यांपूर्वी विभागीय आयुक्त तथा प्रादेशिक संचालक, नगरपरिषद प्रशासन, पुणे विभाग, पुणे यांची पूर्वमंजुरी घेणे आवश्यक राहील.

**११. शुल्काचा कालावधी :**

नगरपरिषद मलकापूर यांची विशेष सभा दिनांक ३ फेब्रुवारी २०२२, ठराव क्रमांक २ नुसार प्रस्तावित केलेल्या सांडपाणी प्रक्रिया योजनेसाठी आवश्यक असणाऱ्या १० टक्के स्वहिस्सा व इतर अनुषंगिक बाबींसाठीचा आवश्यक निधी सदर शुल्काद्वारे प्राप्त झाल्यानंतर हा उपविधी आपोआप संपुष्टात येईल.

**सौरभ राव,**
विभागीय आयुक्त तथा प्रादेशिक संचालक,
पुणे विभाग, पुणे.

पुणे, १९ डिसेंबर २०२२.

---

*महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ चे कलम ३२२* (३) (फ) *अन्वये घनकचरा व्यवस्थापन प्रकल्प शुल्क उपविधी-२०२२, या उपविधीस मान्यता देणेबाबत.*

**वाचा :** (१) महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ चे कलम ३२२ *(३) (फ).*

(२) मा. आयुक्त तथा संचालक, नगरपरिषद प्रशासन संचालनालय, मुंबई यांचेकडील आदेश क्रमांक नपसु-२००१/प्र. क्र. १/२००१/५, दिनांक १ जानेवारी २००१.

(३) मुख्याधिकारी, मलकापूर नगरपरिषद यांचेकडील पत्र क्रमांक जा. क्रमांक मलकापूर-सातारा/उपविधी/५१८/२०२२, दिनांक २५ जुलै २०२२.

(४) मा. जिल्हाधिकारीसो, सातारा यांचेकडील क्रमांक साशा/नपा/का. २/११८/२०४७/२०२२, दिनांक २ सप्टेंबर २०२२ व क्रमांक ४३८, दिनांक २६ सप्टेंबर २०२२ चे पत्र.

***अधिसूचना***

क्रमांक नपा/२/कावि-८८२/२०२२.--ज्याअर्थी, महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ चे कलम ३२२ *(१)* अन्वये नगरपरिषदेस आपला कारभार चालविणेसाठी उपविधी करण्याचा अधिकार आहे. त्यानुसार मलकापूर नगरपरिषदेने महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ चे कलम ३२२ *(३) (अ)* अन्वये मलकापूर नगरपरिषद यांनी विशेष सभा दिनांक ३ फेब्रुवारी २०२२ च्या ठराव क्रमांक ४ अन्वये उक्त विषयाची प्रारूप उपविधी करणेस मान्यता दिलेली आहे. त्यानुसार दिनांक १० फेब्रुवारी २०२२ रोजीचे वर्तमानपत्र दै. सकाळ व दै. प्रीतिसंगम यामधून जाहीर नोटिस प्रसिद्ध करून हरकती व सूचना मागविणेत आलेल्या होत्या. मुदतीमध्ये मलकापूर नगरपरिषदेकडे

उपविधीच्या अनुषंगाने प्राप्त हरकती व सूचनांचा विचार करून व त्यांना प्राप्त अधिकारांनुसार मलकापूर नगरपरिषदेने दिनांक १९ जुलै २०२२ रोजीच्या विशेष सभेमध्ये ठराव क्रमांक ३ अन्वये अनुक्रमे घनकचरा व्यवस्थापन प्रकल्प शुल्क उपविधी-२०२२ या उपविधींना मान्यता देण्यात आलेली आहे.

त्याअर्थी, सदर उपविधीची छाननी करून ते योग्य असलेची खात्री झाल्यामुळे महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ चे कलम ३२२ *(३) (फ)* मधील तरतुदींनुसार मला प्राप्त अधिकारांचा वापर करून मी, सौरभ राव, आयुक्त तथा संचालक, नगरपरिषद प्रशासन संचालनालय, पुणे मलकापूर नगरपरिषदेच्या घनकचरा व्यवस्थापन प्रकल्प शुल्क उपविधी-२०२२ या उपविधींना मंजुरी देत आहे. सदरचे उपविधी राजपत्रात प्रसिद्ध झाल्याच्या दिनांकापासून अमलात येतील.

## मलकापूर नगरपरिषद, जिल्हा सातारा

## घनकचरा व्यवस्थापन प्रकल्पासाठी घ्यावयाचे शुल्क उपविधी - २०२२

**१. संक्षिप्त नाव व प्रारंभ :**

(अ) या उपविधीस "मलकापूर नगरपरिषदेचे घनकचरा व्यवस्थापन प्रकल्पासाठी घ्यावयाचे शुल्क संबंधीचे उपविधी-२०२२" असे संबोधण्यात येईल.

(ब) सदरचे उपविधी महाराष्ट्र शासनाच्या राजपत्रात प्रसिद्ध झालेच्या तारखेपासून अमलात येतील.

**२. व्याख्या :**

(१) संदर्भानुसार दुसरा अर्थ अपेक्षित नसेल तर या उपविधीमध्ये.--

(अ) "अधिनियम" म्हणजे महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५.

(ब) "मुख्याधिकारी" म्हणजे नगरपरिषद क्षेत्रासाठी मुख्याधिकारी म्हणून या अधिनियमान्वये नेमलेला किंवा नेमणूक केली असल्याचे समजण्यात आलेली व्यक्ती.

(क) "उपविधी" म्हणजे प्रस्तुतचे उपविधी.

(ड) "कलम" म्हणजे नगरपरिषदेचे अधिनियमाचे कलम.

(इ) "परिषद" म्हणजे मलकापूर नगरपरिषद, जिल्हा सातारा.

(फ) "नगरपरिषद हद्द" म्हणजे मलकापूर नगरपरिषदेची हद्द.

(ग) "इमारत" म्हणजे सदनिका, गाळा, युनिट किंवा इमारतीचा कोणताही भाग.

(ह) "अपार्टमेंट" म्हणजे इमारत किंवा इमारतींचा समूह (रहिवासी, वाणिज्य व औद्योगिक).

(ज) "वैयक्तिक बांधकाम" म्हणजे वैयक्तिक घर किंवा घरांचा समूह (रहिवासी, वाणिज्य व औद्योगिक).

(ल) "बांधकाम व्यावसायिक" म्हणजे विकसक किंवा सक्षम नोंदणीकृत इमारत बांधकाम व्यावसायिक (रहिवासी, वाणिज्य व औद्योगिक).

(म) "अंदाजपत्रकीय रक्कम" म्हणजे महाराष्ट्रातील सर्व महानगरपालिका (बृहन्मुंबई महानगरपालिका वगळून) नगरपरिषदा/नगरपंचायती, प्रभाव व ग्रामीण क्षेत्र यांमधील मिळकतींचे वार्षिक मूल्य दर तक्त्यानुसार मुद्रांक शुल्क आकारणी करण्यासाठी अद्ययावत व सुधारणेसह सर्वसाधारण मार्गदर्शन सूचनेमध्ये मा. नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी वेळोवेळी नमूद केलेले बांधकामाचे प्रस्तावित दर व बांधकामाचे क्षेत्र यानुसार येणारी रक्कम (रहिवासी, वाणिज्य व औद्योगिक).

(न) "शुल्क" म्हणजे नगरपरिषदेच्या कार्यक्षेत्रामध्ये बांधकाम व्यवसायामार्फत अपार्टमेंट बांधून त्यामध्ये सदनिका विक्री करणार आहेत, त्यांना बांधकाम परवानगी देत असताना आकारावयाचे घनकचरा व्यवस्थापन प्रकल्पासाठी शुल्क.

(प) "घनकचरा व्यवस्थापन प्रकल्पासाठी घ्यावयाचे शुल्क" भरण्याचे ठिकाण नगरपरिषद कार्यालयामध्ये निश्चित केलेले ठिकाण.

(र) या उपविधीमध्ये व्याख्या न केलेल्या शब्द प्रयोगांना जो अर्थ महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ मधील अर्थ असेल तोच संबोधनेचा आहे.

**३. शुल्काचा दर व स्वरूप :**

मलकापूर नगरपरिषदेच्या कार्यक्षेत्रामध्ये बांधकाम व्यावसायिकांमार्फत अपार्टमेंट बांधून त्यामध्ये सदनिका विक्री करणार आहेत, अशा बांधकाम व्यावसायिकांना इमारत बांधकाम परवाना देत असताना एकूण अपार्टमेंट बांधकामाच्या अंदाजपत्रकीय रकमेच्या ०.५० टक्के व वैयक्तिक

बांधकामांना इमारत बांधकाम परवाना देत असताना वैयक्तिक बांधकामाच्या अंदाजपत्रकीय रकमेच्या ०.२५ टक्के शुल्क घनकचरा व्यवस्थापन प्रकल्पासाठी शुल्क घेण्यात येईल.

**४. शुल्क आकारण्याची पद्धत :**

महाराष्ट्रातील सर्व महानगरपालिका (बृहन्मुंबई महानगरपालिका वगळून) नगरपरिषदा/नगरपंचायती, प्रभाव व ग्रामीण क्षेत्र यामधील मिळकतींचे वार्षिक मूल्य दर तक्त्यानुसार मुद्रांक शुल्क आकारणी करण्यासाठी अद्ययावत व सुधारणेसह सर्वसाधारण मार्गदर्शक सूचनेमध्ये मा. नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी वेळोवेळी नमूद केलेले बांधकामाचे प्रस्तावित दर व बांधकामाचे क्षेत्र यानुसार आकारण्यात येईल. सदर आकारणी खालीलप्रमाणे असेल.

| अ. क्र. | बांधकामाचा प्रकार | घनकचरा व्यवस्थापन प्रकल्पासाठी आकारणेत येणारे शुल्क |
|---|---|---|
| १ | अपार्टमेंट | (बांधकामाचे क्षेत्र x वार्षिक मूल्यदर तक्त्यानुसार बांधकामाचा दर) x ०.५० टक्के |
| २ | वैयक्तिक बांधकाम | (बांधकामाचे क्षेत्र x वार्षिक मूल्यदर तक्त्यानुसार बांधकामाचा दर) x ०.२५ टक्के |

**५. शुल्कासाठी पात्र असणारे बांधकाम :**

मलकापूर नगरपरिषद कार्यक्षेत्रामध्ये अपार्टमेंट बांधकाम किंवा वैयक्तिक बांधकाम करण्यासाठी येणारे विकसक किंवा सक्षम नोंदणीकृत इमारत बांधकाम व्यावसायिक (रहिवासी, वाणिज्य व औद्योगिक).

**६. शुल्क माफी :**

केंद्र, राज्य सरकार व नगरपरिषदेच्या स्वमालकीच्या इमारती, तसेच मलकापूर नगरपरिषद कार्यक्षेत्रामध्ये जे बांधकाम व्यावसायिक स्वत:च्या बांधकामाच्या क्षेत्रामध्ये घनकचरा व्यवस्थापन प्रकल्प उभे करतील व कार्यन्वित ठेवतील असे अपार्टमेंट किंवा वैयक्तिक बांधकाम, परंतु संबंधितांनी इमारत परवाना घेण्यापूर्वी घनकचरा व्यवस्थापन प्रकल्पाचा सविस्तर आराखडा नगरपरिषदेचे सक्षम अभियंता/महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांच्याकडून मंजूर करून घेणे व त्याप्रमाणे बंधपत्र करून देणे बंधनकारक राहील.

**७. शुल्क म्हणून मिळणाऱ्या शुल्काचा विनियोग :**

घनकचरा व्यवस्थापन प्रकल्पासाठी शुल्क म्हणून प्राप्त होणाऱ्या रकमेसाठी बँकेचे स्वतंत्र खाते उघडणे व स्वतंत्र हिशोब ठेवणे बंधनकारक आहे. घनकचरा व्यवस्थापन प्रकल्पासाठी शुल्कापोटी मिळणारी रक्कम घनकचरा व्यवस्थापन प्रकल्पाच्या उभारणी कामासाठी, प्रकल्पाच्या बळकटीकरणासाठी व प्रकल्प कार्यान्वित करण्यासाठीच खर्च करणे बंधनकारक राहील. सदर योजनेतून शुल्क म्हणून प्राप्त होणारी रक्कम अन्य कारणांसाठी खर्च केल्यास अथवा अन्यत्र वळविल्यास वित्तीय अनियमितता समजण्यात येईल.

**८. शुल्काची वसुली :**

महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ चे कलम १५० व १५२ अंतर्गत वसुली पद्धत अवलंबवायची आहे. उक्त अधिनियमाचे कलम १५० *(१)* नुसार घनकचरा व्यवस्थापन प्रकल्पासाठी शुल्काचे बील देणे, बिलामध्ये शुल्क भरण्यासाठी १ महिन्याची मुदत देणे व त्यानुसार १ महिन्यात शुल्काची वसुली करणे बंधनकारक राहील.

**९. सर्वसाधारण शास्ती :**

सदर उपविधीचे जो कोणी व्यक्ती, संस्था, विकसक किंवा बांधकाम व्यावसायिक भंग करील तो शास्तीनंतर महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ चे कलम २९९ मध्ये नमूद केल्यानुसार सर्वसाधारण शास्तीस पात्र होईल.

**१०. शुल्काचे पुनर्निर्धारण :**

घनकचरा व्यवस्थापन प्रकल्पासाठी घेण्यात येणाऱ्या शुल्कामध्ये सुधारणा अथवा फेरफार करण्यास नगरपरिषद सक्षम राहील, मात्र यासाठी १ महिना मुदतीची नोटिस प्रसिद्ध करणे आवश्यक आहे. तसेच घनकचरा व्यवस्थापन प्रकल्पासाठी घेण्यात येणाऱ्या शुल्कामध्ये सुधारणा अथवा फेरफार करण्यापूर्वी विभागीय आयुक्त तथा प्रादेशिक संचालक, नगरपरिषद प्रशासन, पुणे विभाग, पुणे यांची पूर्वमंजुरी घेणे आवश्यक राहील.

**११. शुल्काचा कालावधी :**

नगरपरिषद मलकापूर यांची विशेष सभा दिनांक ३ फेब्रुवारी २०२२, ठराव क्रमांक ४ नुसार प्रस्तावित केलेल्या घनकचरा व्यवस्थापन प्रकल्पासाठी आवश्यक असणाऱ्या १० टक्के स्वहिस्सा व इतर अनुषंगिक बाबींसाठीचा आवश्यक निधी सदर शुल्काद्वारे प्राप्त झाल्यानंतर हा उपविधी आपोआप संपुष्टात येईल.

**सौरभ राव,**

विभागीय आयुक्त तथा प्रादेशिक संचालक,
पुणे विभाग, पुणे.

पुणे, १९ डिसेंबर २०२२.

*महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ चे कलम ३२२ (३) (फ) अन्वये २४ x ७ पाणीपुरवठा योजना शुल्क उपविधी-२०२२, या उपविधीस मान्यता देणेबाबत.*

**वाचा :** (१) महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ चे कलम ३२२ *(३) (फ)*.

(२) मा. आयुक्त तथा संचालक, नगरपरिषद प्रशासन संचालनालय, मुंबई यांचेकडील आदेश क्रमांक नपसु-२००१/प्र. क्र. १/२००१/५, दिनांक १ जानेवारी २००१.

(३) मुख्याधिकारी, मलकापूर नगरपरिषद यांचेकडील पत्र क्रमांक जा. क्रमांक मलकापूर-सातारा/उपविधी/५१८/२०२२, दिनांक २५ जुलै २०२२.

(४) मा. जिल्हाधिकारीसो, सातारा यांचेकडील क्रमांक साशा/नपा/का. २/११८/२०४७/२०२२, दिनांक २ सप्टेंबर २०२२ चे पत्र व क्रमांक ४३८, दिनांक २६ सप्टेंबर २०२२ चे पत्र.

***अधिसूचना***

क्रमांक नपा-२/कावि-८८३/२०२२.--ज्याअर्थी, महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ चे कलम ३२२ *(१)* अन्वये नगरपरिषदेस आपला कारभार चालविणेसाठी उपविधी करण्याचा अधिकार आहे. त्यानुसार मलकापूर नगरपरिषदेने महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ चे कलम ३२२ *(३) (अ)* अन्वये मलकापूर नगरपरिषद यांनी विशेष सभा दिनांक ३ फेब्रुवारी २०२२ च्या ठराव क्रमांक २ अन्वये उक्त विषयाची प्रारूप उपविधी करणेस मान्यता दिलेली आहे. त्यानुसार दिनांक १० फेब्रुवारी २०२२ रोजीचे वर्तमान पत्र दै. सकाळ व दै. प्रीतिसंगम यांमधून जाहीर नोटिस प्रसिद्ध करून हरकती व सूचना मागविणेत आलेल्या होत्या. मुदतीमध्ये मलकापूर नगरपरिषदेकडे उपविधीच्या अनुषंगाने प्राप्त हरकती व सूचनांचा विचार करून व त्यांना प्राप्त अधिकारानुसार मलकापूर नगरपरिषदेने दिनांक १९ जुलै २०२२ रोजीच्या विशेष सभेमध्ये ठराव क्रमांक २ अन्वये अनुक्रमे २४ X ७ पाणीपुरवठा योजना शुल्क उपविधी-२०२२ या उपविधींना मान्यता देण्यात आलेली आहे.

त्याअर्थी, सदर उपविधीची छाननी करून ते योग्य असलेची खात्री झाल्यामुळे महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ चे कलम ३२२ *(३) (फ)* मधील तरतुदींनुसार मला प्राप्त अधिकाराचा वापर करून मी, सौरभ राव, आयुक्त तथा संचालक, नगरपरिषद प्रशासन संचालनालय, पुणे हे मलकापूर नगरपरिषदेच्या २४ X ७ पाणीपुरवठा योजना शुल्क उपविधी-२०२२ या उपविधींना मंजुरी देत आहे. सदरचे उपविधी राजपत्रात प्रसिद्ध झाल्याच्या दिनांकापासून अमलात येतील.

**मलकापूर नगरपरिषद, जिल्हा सातारा**

**२४ X ७ नळ पाणीपुरवठा योजनेसाठी घ्यावयाचे शुल्क उपविधी - २०२२**

**१. संक्षिप्त नाव व प्रारंभ :**

(अ) या उपविधीस "मलकापूर नगरपरिषदेचे २४ X ७ नळ पाणीपुरवठा योजनेसाठी घ्यावयाचे शुल्कसंबंधीचे उपविधी-२०२२" असे संबोधण्यात येईल.

(ब) सदरचे उपविधी महाराष्ट्र शासनाच्या राजपत्रात प्रसिद्ध झालेच्या तारखेपासून अमलात येतील.

**२. व्याख्या :**

(१) संदर्भानुसार दुसरा अर्थ अपेक्षित नसेल तर या उपविधीमध्ये.--

(अ) "अधिनियम" म्हणजे महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५.

(ब) "मुख्याधिकारी" म्हणजे नगरपरिषद क्षेत्रासाठी मुख्याधिकारी म्हणून या अधिनियमान्वये नेमलेली किंवा नेमणूक केली असल्याचे समजण्यात आलेली व्यक्ती.

(क) "उपविधी" म्हणजे प्रस्तुतचे उपविधी.

(ड) "कलम" म्हणजे नगरपरिषदेचे अधिनियमाचे कलम.

(इ) "परिषद" म्हणजे मलकापूर नगरपरिषद, जिल्हा सातारा.

(फ) "नगरपरिषद हद्द" म्हणजे मलकापूर नगरपरिषदेची हद्द व सध्या नगरपरिषदेचे २४ X ७ नळ पाणीपुरवठा योजना अस्तित्वात असणारी लगतची गावे.

(ग) "इमारत" म्हणजे सदनिका, गाळा, युनिट किंवा इमारतीचा कोणताही भाग.

(ह) "अपार्टमेंट" म्हणजे इमारत किंवा इमारतींचा समूह (रहिवासी, वाणिज्य व औद्योगिक).

(ज) "वैयक्तिक बांधकाम" म्हणजे वैयक्तिक घर किंवा घरांचा समूह (रहिवासी, वाणिज्य व औद्योगिक).

(ल) "बांधकाम व्यवसायिक" म्हणजे विकसक किंवा सक्षम नोंदणीकृत इमारत बांधकाम व्यावसायिक (रहिवासी, वाणिज्य व औद्योगिक).

(म) "शुल्क" म्हणजे नगरपरिषदेच्या कार्यक्षेत्रामध्ये नवीन नळजोडणी करताना महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ चे कलम १५० अन्वये संबंधित मिळकतीच्या संकलित कराएवढी घ्यावयाची २४ X ७ नळ पाणीपुरवठा योजनेसाठी शुल्क.

(न) "२४ X ७ नळ पाणीपुरवठा योजनेसाठी घ्यावयाचे शुल्क" भरण्याचे ठिकाण नगरपरिषद कार्यालयामध्ये निश्चित केलेले ठिकाण.

(प) या उपविधीमध्ये व्याख्या न केलेल्या शब्द प्रयोगांना जो अर्थ महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ मधील अर्थ असेल तोच संबोधनेचा आहे.

**३. शुल्काचा दर व स्वरूप :**

मलकापूर नगरपरिषदेच्या कार्यक्षेत्रामध्ये इमारत, अपार्टमेंट किंवा वैयक्तिक बांधकाम यांना नवीन नळजोडणी करताना महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ चे कलम १५० अन्वये संबंधित मिळकतीच्या वार्षिक संकलित कराएवढी रक्कम २४ X ७ पाणीपुरवठा योजनेसाठी शुल्क घेण्यात येईल.

**४. शुल्क आकारण्याची पद्धत :**

मलकापूर नगरपरिषदेच्या कार्यक्षेत्रातील मिळकतींना प्रत्येक आर्थिक वर्षात महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ चे कलम १५० नुसार मालमत्ता कर व इतर करांचे बील देण्यात येते. संबंधित मिळकतींच्या बिलामध्ये नमूद करण्यात आलेली वार्षिक संकलित कराएवढी रक्कम इमारत, अपार्टमेंट किंवा वैयक्तिक बांधकाम यांना नवीन २४ X ७ नळ जोडणी करताना पाणीपुरवठा योजनेसाठी शुल्क आकारण्यात येईल.

**५. शुल्कासाठी पात्र असणारे बांधकाम :**

मलकापूर नगरपरिषद कार्यक्षेत्रामध्ये बांधकाम पूर्ण झालेली इमारत, अपार्टमेंट किंवा वैयक्तिक बांधकाम यांच्याशी संबंधित व्यक्ती, संस्था, विकसक किंवा बांधकाम व्यावसायिक यांनी नवीन नळ जोडणी करण्यासाठी अर्ज केल्यानंतर संबंधित इमारत, अपार्टमेंट किंवा वैयक्तिक बांधकाम (रहिवासी, वाणिज्य व औद्योगिक).

**६. शुल्क माफी :**

केंद्र, राज्य सरकार व नगरपरिषदेच्या स्वमालकीच्या इमारती तसेच मलकापूर नगरपरिषदेच्या पाणीपुरवठा योजनेवर अवलंबून नसलेली व्यक्ती, संस्था, विकसक किंवा बांधकाम व्यावसायिक.

**७. शुल्क म्हणून मिळणाऱ्या शुल्काचा विनियोग :**

२४ X ७ नळ पाणीपुरवठा योजना शुल्क म्हणून प्राप्त होणाऱ्या रकमेसाठी बँकेचे स्वतंत्र खाते उघडणे व स्वतंत्र हिशोब ठेवणे बंधनकारक आहे. २४ X ७ नळ पाणीपुरवठा योजनेसाठी शुल्कापोटी मिळणारी रक्कम पाणीपुरवठा योजनेच्या उभारणी कामासाठी, योजनेच्या बळकटीकरणासाठी व योजना कार्यान्वित करण्यासाठीच खर्च करणे बंधनकारक राहील. सदर योजनेतून शुल्क म्हणून प्राप्त होणारी रक्कम अन्य कारणांसाठी खर्च केल्यास अथवा अन्यत्र वळविल्यास वित्तीय अनियमितता समजण्यात येईल.

**८. शुल्काची वसुली :**

महाराष्ट्रा नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ चे कलम १५० व १५२ अंतर्गत वसुली पद्धत अवलंबवायची आहे. उक्त अधिनियमाचे कलम १५० *(१)* नुसार पाणीपुरवठा योजनेसाठी शुल्काचे बील देणे, बिलामध्ये शुल्क भरण्यासाठी १ महिन्याची मुदत देणे व त्यानुसार १ महिन्यात शुल्काची वसुली करणे बंधनकारक राहील.

**९. सर्वसाधारण शास्ती :**

सदर उपविधीचे जो कोणी व्यक्ती, संस्था, विकसक किंवा बांधकाम व्यावसायिक भंग करील तो शास्तीनंतर महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ चे कलम २९९ मध्ये नमूद केल्यानुसार सर्वसाधारण शास्तीस पात्र होईल.

**१०. शुल्काचे पुनर्निर्धारण :**

२४ X ७ नळ पाणीपुरवठा योजनेसाठी घेण्यात येणारे शुल्कामध्ये सुधारणा अथवा फेरफार करण्यास नगरपरिषद सक्षम राहील, मात्र यासाठी १ महिना मुदतीची नोटिस प्रसिद्ध करणे आवश्यक आहे. तसेच २४ X ७ नळ पाणीपुरवठा योजनेसाठी घेण्यात येणाऱ्या शुल्कामध्ये सुधारणा अथवा फेरफार करण्यापूर्वी विभागीय आयुक्त तथा प्रादेशिक संचालक, नगरपरिषद प्रशासन, पुणे विभाग, पुणे यांची पूर्वमंजुरी घेणे आवश्यक राहील.

**११. शुल्काचा कालावधी :**

नगरपरिषद मलकापूर यांची विशेष सभा दिनांक ३ फेब्रुवारी २०२२, ठराव क्रमांक ३ नुसार प्रस्तावित केलेल्या २४ X ७ नळ पाणीपुरवठा योजनेसाठी आवश्यक असणाऱ्या १० टक्के स्वहिस्सा व इतर अनुषंगिक बाबींसाठीचा आवश्यक निधी सदर शुल्काद्वारे प्राप्त झाल्यानंतर हा उपविधी आपोआप संपुष्टात येईल.

**सौरभ राव,**
विभागीय आयुक्त तथा प्रादेशिक संचालक,
पुणे विभाग, पुणे.

पुणे, १९ डिसेंबर २०२२.

---

## पुढील अधिसूचना असाधारण राजपत्र म्हणून खाली दर्शविलेल्या दिनांकास प्रसिद्ध झाल्या आहेत.

**मंगळवार, डिसेंबर १३, २०२२ /  अग्रहायण २२, शके १९४४**

## जिल्हाधिकारी यांजकडून

***आदेश***

क्रमांक पसन/कावि/कार्या-१/२३०३/२०२२.--- महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ च्या कलम ५१-अ अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारानुसार मी, डॉ. राजेश देशमुख, जिल्हाधिकारी, पुणे, या प्रकटनाद्वारे असे जाहीर करतो की, पुणे जिल्ह्यातील भोर नगरपरिषदेच्या उपाध्यक्षपदाचे निवडणुकीसाठी दिनांक १६ नोव्हेंबर २०२२ रोजी घेण्यात आलेल्या विशेष सभेमध्ये खालील सदस्य उपनगराध्यक्ष म्हणून निवडून आले आहेत.

**परिशिष्ट**

| अ. क्र. | नगरपरिषदेचे नाव | उपनगराध्यक्षांचे नाव |
|---|---|---|
| १ | २ | ३ |
| १ | भोर | समिर उत्तम सागळे |

**डॉ. राजेश देशमुख,**
जिल्हाधिकारी, पुणे.

पुणे, १२ डिसेंबर २०२२.

---

## BY COLLECTOR

***Order***

No. PSN/WS/KS-1/2303/2022.—In exercise of the powers vested in me under Section 51-A of the Maharashtra Municipal Councils, Nagarpanchayats and Industrial Townships Act, 1965, I, Dr. Rajesh Deshmukh, Collector, Pune, hereby publish the name of person who has been declared elected as Vice-President of Nagarparishad, Bhor in special meeting conveyed on 16th November 2022.

**Schedule**

| Sr. No. | Name of Nagarparishad | Name of Vice-President |
|---|---|---|
| 1 | 2 | 3 |
| 1 | Bhor | Sameer Uttam Sagale |

**Dr. RAJESH DESHMUKH,**
Collector, Pune.

Pune, 12th December 2022.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT YERAWADA PRISON PRESS, PRISON COMPOUND, YERAWADA, PUNE-411 006 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI – 400 004.

EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.